# DIRECTORATE OF PUBLIC PROSECUTIONS.
## MAHARASHTRA STATE, MUMBAI.
## सरकारी अभियोग संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

फ्री प्रेस जर्नल मार्ग, ६, नरीमन इमारतीच्या मागे, विनय वाच्छा मार्ग, मुंबई-२० ☎ २२०२ ८११३ फॅक्स २२८८ ६९०२
E-mail:- DPP_Maharashtra@maharashtra.gov.in


क्र. विसअने / १२९ / ७४६ / २००४ दिनांक : २६ / ०३ / २००४

**-: परिपत्रक :-**

विषय :- सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी पोलीस विभागा व्यतिरिक्त न्यायालयीन शासकिय प्रकरणे चालविणेबाबत.

शहाणे विरुध्द महाराष्ट्र शासन (१९९६ ए.आय.आर. १६२८) या प्रकरणात पोलीस अभियोक्त्याचा वेगळा संवर्ग करण्याचा आदेश मा. सर्वोच्च न्यायालयांने शासनास दिले. परिणामी, शासनाने क्र. एसपीपी-२२९५/प्र.क्र.१४९/पोल-१०, दि. २०-०५-१९९७ च्या शासन निर्णयान्वये सरकारी अभियोग संचालनालयाची पुनर्रचना केली व सर्व अभियोक्ते या संचालनालयाच्या प्रशासकिय अधिपत्याखाली आणण्यात आले. तत्पुर्वी, शासनाने पोलीस अभियोक्ता संवर्गातील अधिकाऱ्यांना सहाय्यक सरकारी अभियोक्ता असे नामाभिधान केले होते. त्यामुळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता प्रवर्गातील अधिकारी हा त्याला नेमून दिलेल्या न्यायालयांतील शासनाच्या कोणत्याही विभागाने दाखल केलेल्या फौजदारी प्रकरणांत खटले चालविणेस बांधील आहे. अशी परिस्थिती असतांना देखील असे निदर्शनास आले आहे की, अन्न व औषध प्रशासनामार्फत दाखल झालेले औषध व सौंदर्य प्रसाधने कायदा, १९५४ अंतर्गत दाखल झालेले फौजदारी खटले चालविणेस अनास्था प्रकट करीत आहेत.

याशिवाय शासनाच्या वन विभागामार्फत भारतीय वन कायदा अंतर्गत फौजदारी खटले दाखल केले जातात. कामगार विभागामार्फत औद्योगिक कलह कायदा आणि बाल मजूर प्रतिबंधक कायदा तसेच वेठबिगार प्रतिबंधक कायदा अंतर्गत खटले दाखल केले जातात. तसेच राज्य उत्पादन शुल्क विभागाकडून दारुबंदी प्रतिबंधक कायद्याअंतर्गत खटले दाखल केले जातात.

या संचालनालयामार्फत नियुक्त करण्यात आलेले सहाय्यक सरकारी अभियोक्ते यांच्या नेमणुका न्यायालयाप्रमाणे आहेत. म्हणजेच तो सहाय्यक सरकारी अभियोक्ता हा त्या न्यायालयाच्या न्यायदान प्रक्रियेतील महत्वाचा घटक आहे. याचाच अर्थ तो त्या न्यायालयातील दाखल झालेल्या खटल्यांचा अभियोग पक्षाच्या वतीने प्रभारी असतो. ज्या सहाय्यक सरकारी अभियोक्त्याची त्यांचे संबंधित न्यायालयात जेवढी फौजदारी विषयक प्रकरणे दाखल झालेली असतील तेवढी त्याने हाताळावयाची असतात. सदरचा अभियोक्ता पोलीस विभागाव्यतिरिक्त महाराष्ट्र शासनाच्या अन्य कोणत्याही विभागाची

कृ.मा.प. ...

फौजदारी प्रकरणे चालविणेस सक्षम आहे. सबब, सर्व सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता यांना निर्देशित करण्यात येते की, त्यांनी आपल्या अधिपत्याखालील सर्व सहाय्यक सरकारी अभियोक्त्यांना ते कार्यरत असलेल्या न्यायालयातील फौजदारी खटले शासनाच्या कोणत्याही विभागाची असले तरी चालविण्याच्या सूचना द्याव्यात. याकरिता कोणतेही वेगळे मानधन मिळण्यास ते पात्र नाहीत, याची नोंद घ्यावी.

सदर सूचना सर्व अभियोक्त्यांना पाठविल्याबाबतचा अनुपालन अहवाल या संचालनालयास सादर करण्यात यावा.

( श. मा. देशमुख )
संचालक
सरकारी अभियोग संचालनालय,
महाराष्ट्र राज्य, मुंबई.

प्रति,

सहाय्यक संचालक व सरकारी अभियोक्ता/
अतिरिक्त सरकारी अभियोक्ता
द्वारा : पोलीस आयुक्त / अधीक्षक /
प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण विद्यालय,
जि.